**ठळक बातम्या**

- राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत संपन्न, आपत्तीकाळात आधुनिक तंत्रज्ञानाचा अचूक वापर करुन व्यवस्थापन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

- राज्यातल्या वनालगतच्या गावांमधे कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित कॅमेरे लावण्याचे वनमंत्री गणेश नाईक यांचे निर्देश

- मिरज कॉर्ड लाईनला रेल्वेमंत्रालयाची मंजुरी, १२८ कोटी ७८ लाख रुपये खर्चाला मान्यता

**आणि**

- मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या दोन दिवसात ८ कोटी साठ लाख रुपये किमतीचा गांजा जप्त

**<><><><><>**

नैसर्गिक आपत्तीकाळात सामान्य नागरिकांना झळ बसू नये यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अचूक वापर करुन व्यवस्थापन करावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक मुंबईच्या सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते.

नद्यांच्या पूर रेषेच्या आत अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी, यासाठीचं सर्वेक्षण करताना अचूकतेसाठी उपग्रहाद्वारे मॅपिंग करावं. भूमिगत वीज वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळामधले आसरे

बांधणे, दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची आणि वीज अटकाव ही कामं वेगाने करावी, असं त्यांनी सांगितलं.

आपदा मित्रांना आवश्यक प्रशिक्षण देऊन त्यांचा डाटाबेस तयार करावा. आपत्तीसंदर्भात सर्वंकष अभ्यास करून ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापनाचे संच उपलब्ध करून द्यावे, असंही फडणवीस यांनी सांगितलं.

नद्यांची वहन क्षमता वाढवण्यासाठी नदी स्वच्छ करून नदीतील गाळ काढणे, राडा रोडा काढणे आवश्यक आहे. या कामाला जलसंपदा विभागानं प्राधान्य द्यावं, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**<><><><><>**

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या घरांच्या दुरुस्तीसाठी आपत्तीग्रस्तांना ४९ कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यासाठी मान्यता दिल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. या संदर्भातला शासन निर्णय जारी करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं. या निर्णयानुसार राज्य आपत्ती निवारण निधीच्या मानकानुसार कोकण विभागाला ५ कोटी रुपये, पुणे विभागाला १२ कोटी रुपये, नाशिक विभागाला ५ कोटी रुपये, छत्रपती संभाजीनगर विभागाला १२ कोटी रुपये, अमरावती विभागाला ५ कोटी रुपये आणि नागपूर विभागाला १० कोटी रुपये असे एकूण ४९ कोटी रुपये इतका निधी वितरीत करायला मान्यता देण्यात आली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राची वाटचाल संरक्षण उत्पादन निर्मिती हब आणि स्टार्ट अप हबच्या दिशेनं सुरु आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते आज मुंबईत बँक ऑफ अमेरिका फ्लॅगशिप इंडिया परिषदेत बोलत होते. केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया योजनेचा राज्याला मोठा लाभ झाला आहे, राज्याच्या प्रशासनात डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करुन सुलभता आणण्याचा प्रयत्न

करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. महानगरांवरचा वाढता भार कमी करण्यासाठी द्वितीय आणि तृतीय श्रेणींची शहरं विकसित करण्यात येत आहेत. याच प्रयत्नांचा भाग म्हणून औद्योगिकीकरणाचं विकेंद्रीकरण करुन छत्रपती संभाजीनगर, नांदेड, गडचिरोली ही शहरं विकसित करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या वनालगतच्या गावांमधे कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित कॅमेरे लावण्याचे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी आज दिले. वन्यजीव आणि मनुष्य संघर्ष टळावा यासाठी हे कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. विदर्भात सातत्याने होणाऱ्या वन्यप्राणी आणि मनुष्य संघर्षाबाबत आज मंत्रालयात बैठक झाली. जंगलातील प्राणी संख्या नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना कराव्यात, वनांमध्ये तृणभक्षक प्राण्यांसाठी गवत आणि वनस्पतींची मोठ्या प्रमाणात लागवड करावी, तसंच वाघांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना शासकीय नोकरी देण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही नाईक यांनी यावेळी दिले. वन परिसरात यापूर्वीच मंजूर रस्त्यांची दुरुस्ती परवानगीसाठी अडवणूक करू नये, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

जपानचे वाणिज्य दूतावास अधिकारी यागी कोजी यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सदिच्छा भेट घेतली. जपानची भारतात मोठी गुंतवणूक आहे. रोजगारनिर्मितीबरोबरच राज्याच्या औद्योगिक, आर्थिक, सामाजिक प्रगतीत मोलाचं योगदान देणाऱ्या जपानी कंपन्यांच्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी वातावरण निर्मिती करण्यासंदर्भात त्यांनी उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. उद्योग तसंच आर्थिक क्षेत्रातील सहकार्यासोबतच सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही भारत आणि जपान यांच्यातील सहकार्य वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याबाबतही त्यांनी चर्चा केली.

<><><><><>

भारत भेटीनं आपण प्रभावित झाल्याची भावना पॅराग्वेचे अध्यक्ष सँटियागो पेना पॅलासिओस यांनी आज व्यक्त केली. तीन दिवसांच्या भारतभेटीवर आलेल्या पॅलासिओस यांनी आज मुंबईला भेट दिली. यावेळी त्यांचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी स्वागत केलं. जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आलेल्या भारतानं आगामी काळात जागतिक पटलावर महत्त्वाची भूमिका बजावावी. भारतासोबत कृषी, नवीकरणीय ऊर्जा यांसह विविध क्षेत्रात भागीदारी करण्याची आपली इच्छा असल्याचंही पॅलासिओस यांनी यावेळी व्यक्त केलं.

<><><><><>

मध्य रेल्वेच्या मिरज या मुख्य स्थानकाची रेल्वे कनेक्टिव्हीटी आणि मालवाहतूक यामध्ये सुलभता आणण्याच्या दृष्टीनं उपयुक्त अशा मिरज कॉर्ड लाईनला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंजुरी दिली आहे. १२८ कोटी ७८ लाख रुपये खर्चाच्या या प्रकल्पांतर्गत १ पूर्णांक ७३ किलोमीटर च्या मिरज कॉर्ड लाईन बरोबरच मल्टीट्रॅकिंग, उड्डाणपूल तसंच बायपास लाईन क्षमतेत वाढ अशी अनेक कामे केली जातील. कुर्डूवाडी किंवा हुबळीकडून कोल्हापूरकडे जाणाऱ्या रेल्वेगाड्या तांत्रिक कारणांसाठी मिरज जंक्शनजवळ  एक ते दोन तास थांबतात. मिरज कॉर्ड लाईन प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर मिरज-पुणे, मिरज-कोल्हापूर, मिरज-पंढरपूर आणि मिरज-लोंढा अशा मार्गांना जोडणारा एक मुख्य इंटरचेंज पॉईंट मिळेल आणि मिरज जंक्शनवरुन होणारी प्रवासी तसंच मालवाहतूक वेगवान होईल. मिरज ते कोल्हापूर प्रवास अधिक वेगवान करावा, अशी मागणी बऱ्याच काळापासून होत आहे. या प्रकल्पामुळे या मागणीच्या पूर्ततेबरोबरच पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वे सुविधांमध्ये भर पडेल.

<><><><><>

पिंपरी चिंचवड शहरात जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचं १९ जून तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचं पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये २० जूनला आगमन होणार असून, त्याच दिवशी पालख्या पुण्याच्या दिशेनं मार्गस्थ होणार आहेत. या दोन्ही सोहळ्याच्या स्वागताची महापालिकेकडून सुरू असलेली तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणाची आणि वारकरी भवनाच्या नियोजित ठिकाणांची पाहणी करून आढावा घेतला.

<><><><><>

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या दोन दिवसात सीमाशुल्क विभागानं ८ कोटी साठ लाख किमतीचा गांजा जप्त केला. बँकॉकहून दोन वेगवेगळ्या विमानातून आलेल्या प्रवाशांचा संशय आल्यानं त्यांची कसून तपासणी केली असता त्यांनी सामानातून सुमारे साडेआठ  किलो गांजा लपवून आणल्याचं उघडकीस आलं. या प्रकरणी तीन भारतीय नागरिकांना अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याखाली अटक केली आहे.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यातल्या चिखली मेहकरदरम्यान भरधाव जाणाऱ्या ट्रकमुळे झालेल्या अपघातात तिघेजण मृत्यूमुखी पडले. वेगात जाणाऱ्या ट्रकने चारचाकीला धडक दिली आणि ती चारचाकी दुचाकीवर आदळली, दुचाकीवरचे दोघे आणि चारचाकीतली एक अशा एकूण तीन व्यक्ती या अपघातात दगावल्या. जखमींवर उपचार सुरु आहेत.

//<><><><><>//